# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ३७९/२०२४

**तक्रारकर्ता,** श्रीमती सीमा विजय अवसरे,
रा.पांडुरंग निवास, पहिला मजला,
रुम नं.८, कोलशेत वरचा गांव, पो.सॅन्डोज बाग,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०७.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, जयस्तंभ, ता.जि.रत्नागिरी

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, जयस्तंभ, ता.जि.रत्नागिरी

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय संगमेश्वर (देवरुख), ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी ४१५ ८०४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय संगमेश्वर (देवरुख), ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी ४१५ ८०४.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २०/४/२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २०/७/२०२३ | ---- | २८/८/२०२३ | २५/१०/२०२३ |

तक्रारकर्ता यांनी दि.३/७/२०२४ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २०/४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती श्रुती सावंत, सध्या कार्यरत- नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय रत्नागिरी अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री. देवदास खेडेकर, महसूल नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय संगमेश्वर (देवरूख) उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"*मौजे किरडूवे तालुका संगमेश्वर जि.रत्नागिरी येथील गट नं.३०१ बाबत कुळ इतर हक्कांत महादेव भिकाजी बारगुडे हे बाजूस लिहिलेल्या जमिनीत कलम ३२ ओ खालील दि.१/४/१९५७ नंतरचे कुळ असल्याचा ७० ब चा निर्णय टेनन्सी केस नं.८०/८२ दि.७/३/१९८३ चा झालेप्रमाणे इतर हक्कांत नाव दाखल होणेस नोंद केली असून, फेर फार क्र.२२ मंजूर केलेला आहे.*
*१. सदर वादातील जमिन मिळकतीचा आपल्या न्यायकक्षेत ७० ब अन्वये संपूर्ण प्रोसेडींग म्हणजे रोजनामा, अर्ज, लेखी जबाब, साक्षीपुराव्याची प्रत व अंतिम निर्णयाची प्रत मिळावी. सदर प्रोसेडींमध्ये जी काही कागदपत्रे सादर केली असतील ती सर्व प्रोसेडींगची कागदपत्रे संपूर्ण (नस्ती) मला माहिती अधिकार लोगोसह नंबरींगसह साक्षांकित करून मिळावी.*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२५/१०/२०२३ रोजी, "*अपील अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी २ दिवसांच्या आत उपलब्ध माहिती अर्जदारास विनाशुल्क पुरविण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांना सुनावणीची सूचना प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्यांचे कार्यालयात आढळ होऊन आलेली नाही. त्याप्रमाणे तक्रारकर्ता यांना कळविले आहे. तथापि ही माहिती का आढळून आली नाही त्याचा खुलासा त्यांनी पुढील सुनावणीस सादर करावा.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती, तहसिलदार कार्यालय संगमेश्वर (देवरूख) कार्यालयात का आढळून येत नाही. याबाबतचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय संगमेश्वर (देवरूख) यांनी पुढील सुनावणीस सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१३/७/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २० एप्रिल २०२६ .

**( In Continuation Of Order Date 20/4/2026)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज दि.१३/७/२०२६ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपीलकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.देवदास खेडकर, महसूल नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय संगमेश्वर (देवरूख) ऑनलाइन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.बजरंग चौगुले, तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.देवदास खेडकर, महसूल नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय संगमेश्वर (देवरूख) त्यांनी आयोगास उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आजपर्यंत तक्रारकर्तास माहिती का देण्यात आली नाही, कागदपत्रे आढळून येत नाही यासाठी कोण जबाबदार आहे त्यांचेवर काय कार्यवाही करण्यात आली याबाबत तहसिलदार संगमेश्वर(देवरुख) यांनी स्वत: पुढील सुनावणीस आयोगासमोर उपस्थित राहून शपथपत्र दाखल करावे.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२०/७/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ जुलै २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तहसिलदार, तहसिल कार्यालय संगमेश्वर (देवरुख),
ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी ४१५ ८०४.